MHKO150002552024

फौजदारी नियमावलीच्या परिच्छेद ४४ (१) परिशिष्ट ६ प्रमाणे भाग – अ.

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.**

( समक्ष – आर. पी. थोरे )

न्यायनिर्णय तारीख – १६ मे, २०२६.

**कौ.हिं.म.सं.अर्ज क्र.६/२०२४. निशानी क्र. / बी.**

**अर्जदार** – **क्रांती सुरेश राणे.**
वय – २५ वर्षे, व्यवसाय – घरकाम,
सध्या द्वारा बाळासाहेब सतबा गुरव,
रा. धामणे, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

**उपस्थिती** – **श्रीमती. एस. डी. पाटील, वकील.**

**गैरअर्जदार** – **१. सुरेश कुंडलीक राणे,**
वय – २७ वर्षे, व्यवसाय – नोकरी,
**२. मंगल कुंडलीक राणे,**
वय – ५० वर्षे, व्यवसाय – गृहीणी,
**३. कुंडलीक गणपती राणे,**
वय – ५५ वर्षे, व्यवसाय – नोकरी,
सर्व रा. मडुर, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर.

**उपस्थिती** – **श्री. आर. एन. ठाकूर आणि श्री. आर. एस. चव्हाण, वकील**

**अर्ज : कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२ अन्वये**

**अर्जाचा तपशील**

फौजदारी नियमावलीच्या परिच्छेद ४४ (२) परिशिष्ट ६ प्रमाणे भाग – ब.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अर्ज दाखल केल्याची तारीख | – | ०२.०५.२०२४ |
| २. | पुरावा बंद झाल्याची तारीख | – | १६.०२.२०२६ |
| ३. | युक्तीवाद पुर्ण केल्याची तारीख | – | २७.०४.२०२६ |
| ४. | न्यायनिर्णयासाठी ठेवल्याची तारीख | – | १६.०५.२०२६ |
| ५. | न्यायनिर्णय तारीख | – | १६.०५.२०२६ |

६. अंतिम आदेश – अर्ज अंशतः मंजूर.

७. कालावधी – ०२ व. ०० म. १४ दि.

**न्यायनिर्णय**

अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज कौटुंबिक हिसांचारा पासुन महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२ प्रमाणे दाखल करुन गैरअर्जदारांच्या विरोधात संरक्षण, स्त्रीधन परत देण्याचा, घरभाडे, निर्वाह भत्ता आणि नुकसान भरपाई आदेश मिळण्याची मागणी केली आहे. (*येथुन पुढे सोयीसाठी याचा ''सदर कायदा''असा उल्लेख केला आहे.*)

**अर्जदाराचे थोडक्यात कथन –**

**२.** अर्जदाराचा गैरअर्जदार क्र.१ सोबत दि.१६.११.२०२० रोजी विवाह झालेला असून त्यांच्यातील नातेसंबंध आजपर्यंत अस्तित्वात आहेत. गैरअर्जदार क्र. १ ला दारूचे व्यसन असून त्याने दारूच्या नशेत अर्जदाराला शिवीगाळी व मारहाण करून तिचा शारिरीक, मानसिक व लैंगिक छळ केला आहे. गैरअर्जदारांनी लग्न ठरवताना त्यांना स्वतःचे घर असून ४५ एकर शेती असल्याची खोटी माहिती सांगून तसेच गैरअर्जदार क्र. १ ला असलेल्या गजकर्णाच्या आजाराची माहिती लपवून अर्जदार व तिच्या आई वडीलांची फसवणूक केलेली आहे. अर्जदारावरती गैरअर्जदारांनी मुलबाळ होत नसल्यामुळे त्रास देण्यास सुरवात केल्यावर तिने स्वतःवरती औषधोपचार केला असून गैरअर्जदार क्र. १ ने उपचारासाठी नकार दिलेला आहे. गैरअर्जदार क्र.१ च्या गजकर्णाच्या व्याधीची अर्जदाराला लागण झालेली असून तिच्या उपचाराचा संपूर्ण खर्च तिच्या आई वडीलांना करावा लागत आहे. गैरअर्जदारांनी अर्जदाराकडे पाच तोळे सोन्याची, घरबांधकामासाठी व दुचाकी गाडी घेण्यासह गारगोटी येथे हॉटेल सुरू करण्यासाठी ५,००,०००/– ची मागणी करून तिला नांदवण्यास नकार देवून दि.१५.०९.२०२१ रोजी घरातून हाकलून दिलेले आहे. गैरअर्जदार व तिच्या आई वडीलांनी मध्यस्तांमार्फत पर्यत्न करून देखील गैरअर्जदारांनी अर्जदाराला नांदवण्यास नकार दिल्यामुळे तिला माहेरी रहावे लागत आहे. अर्जदाराला उत्पन्नाचे साधन नसून गैरअर्जदार क्र. १ ला हॉटेलमधील नोकरीपासून दरमहा १५,०००/– रुपये आणि कसण्यासाठी घेतलेल्या ४५ एकर शेतीपासून प्रतिवर्ष ३,५०,०००/– चे उत्पन्न मिळते. सबब, तिने तिच्या अर्जातील संरक्षण, स्त्रीधन परत

देण्याचा, घरभाडे, निर्वाह भत्ता आणि नुकसान भरपाईच्या मागण्या मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**गैरअर्जदारांचे थोडक्यात कथन –**

३. गैरअर्जदारांनी सदर प्रकरणामध्ये वकीलांमार्फत उपस्थित होवून देखील लेखी म्हणणे सादर केलेले नसल्यामुळे त्यांच्या विरोधात सदर प्रकरण विना लेखी म्हणणे चालवण्यात येत असलेबाबतचा नि.क्र.१ वरती आदेश करण्यात आला आहे.

**विचाराधीन मुद्दे व त्यांचे निष्कर्ष –**

४. अर्जदाराची कथने आणि तिच्या व साक्षीदाराच्या विनाआव्हानित पुराव्या वरुन पुढील मुद्दे या न्यायालयाच्या विचारासाठी उपस्थित होत असुन त्यावरील निष्कर्ष कारण मिमांसेसह पुढील प्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **विचाराधीन मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | गैरअर्जदारांनी अर्जदारावरती कौटुंबिक हिंसाचार केल्याची बाब सिध्द होत आहे काय ? | . . **होय.** |
| २. | अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ कडून निवासासाठी दरमहा ५,०००/– रुपये मिळण्यास पात्र आहे काय ? | . . **नाही.** |
| ३. | अर्जदार ही गैरअर्जदारांच्या विरोधात संरक्षण आदेशासह त्यांच्याकडून लग्नातील स्त्रीधन परत देण्याचा आदेश मिळण्यास पात्र आहे काय ? | . . **नाही.** |
| ४. | अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ कडून आर्थिक मदत म्हणुन दरमहा १५,०००/– रुपये मिळण्यास पात्र आहे काय ? | . . **अंशतः होय.** |
| ५. | अर्जदार ही गैरअर्जदारांकडून नुकसान भरपाई करीता ५,००,०००/– रुपये मिळण्यास पात्र आहे काय ? | . . **अंशतः होय.** |
| ६. | अंतिम आदेश काय ? | . . **अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.** |

**पटलावरील पुरावा आणि युक्तीवाद –**

**५.** अर्जदाराने तिच्या अर्जातील कथनाच्या पृष्ठतेसाठी स्वतःची नि. क्र.१० प्रमाणे साक्ष नोंदवली आहे. अर्जदाराने तिच्या पुराव्याला पृष्टी देण्यासाठी नि.क्र.३/१ वरती विवाह नोंदणी प्रमाणपत्र आणि नि.क्र.३/२ वरती तिचे आधार ओळखपत्र दाखल केले आहे. अर्जदाराने नि. क्र.११ प्रमाणे पुरशिस सादर करुन तिला अतिरिक्त पुरावा द्यायचा नसल्याचे न्यायालयास सूचित केले आहे.

**६.** गैरअर्जदारांतर्फे अर्जदाराचा उलट तपास घेण्यात आलेला नसून त्यांनी त्यांच्या बचावामध्ये कोणताही तोंडी अथवा कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही.

**७.** अर्जदाराच्या वकिलांनी गैरअर्जदारांनी अर्जदारावरती केलेला कौटुंबिक हिंसाचार तिच्या व साक्षीदाराच्या विनाआव्हानित पुराव्यातून सिध्द झालेला असल्यामुळे अर्ज मंजूर करुन जास्तीत जास्त पोटगी, घरभाडे व नुकसान भरपाई मंजूर करण्याची विनंती केली आहे. गैरअर्जदारांना पुरेशी संधी देवून देखील त्यांच्या वतीने युक्तीवाद करण्यात आलेला नसल्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्याकरिता न्यायनिर्णयासाठी घेण्यात आलेले आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

**मुद्दा क्र. १ ते ५ करीता –**

**८.** मुद्दा क्र.१ ते ५ हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे मी ते एकत्रीतपणे चर्चेसाठी घेत आहे. गैरअर्जदारांनी सदर प्रकरणात हजर होवून अर्जदारा सोबतचे नाकारलेले नसल्यामुळे त्यांच्यात नातेसंबंधाबाबत वाद नसल्याचा निष्कर्ष निघतो. कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कलम ३ मध्ये कौटुंबीक हिंसाचाराची व्याख्या दिलेली आहे. त्याप्रमाणे अर्जदार हिने व्यथीत व्यक्ती असल्याची बाब सिध्द करण्यासाठी गैरअर्जदारांनी तीच्यावरती कशाप्रकारे शारिरिक, मानसिक आणि आर्थिक हिंसाचार केला ही बाब सिध्द करणे आवश्यक आहे.

**९.** त्या अनुषंगाने अर्जदाराच्या पुराव्याचे अवलोकन केले असता, तिने तिच्या पुराव्यामधुन अर्जातील कथनांची पुनरावृत्ती केली आहे. तिच्या पुराव्याचा थोडक्यात सारांश म्हणजे, गैरअर्जदारांनी चुकीची माहिती सांगून तसेच गैरअर्जदार क्र. १ च्या आजाराची बाब लपवून तिची फसवणूक केली आहे. तिला मुल होत नसल्याच्या

कारणावरून त्रास देण्यासह गैरअर्जदार क्र.१ ने दारूच्या नशेत मारहाण केलेली आहे. त्याच बरोबर गैरअर्जदार क्र. १ च्या आजाराची तिला लागण झालेली असून तिच्या उपचाराची कोणतीही दक्षता घेतलेली नाही. गैरअर्जदारांनी तिच्याकडे नांदण्यासाठी पाच तोळे सोन्यासह ५,००,०००/- रुपयांची मागणी करून त्याच्या पुर्ततेसाठी तिचा शारिरीक व मानसिक छळ केला असून ती माहेरी राहत असल्यापासून तिच्या उदरनिर्वाहाची कोणतीही तरतूद केलेली नाही.

**१०.** अर्जदाराचा पुरावा गैरअर्जदारांनी उलट तपास घेतलेला नसल्यामुळे विनाआव्हानित राहिलेला आहे. गैरअर्जदारांना पुरेशी संधी देऊन देखील त्यांनी त्यांचा बचाव मांडण्याची अथवा अर्जदाराचा उलटतपास घेवून तिने केलेले आरोपी खोडून काढण्याची तसदी घेतलेली नाही. त्यामुळे अर्जदाराने केलेले सर्व आरोप विनाआव्हानित राहिलेले असून गैरअर्जदारांनी तिच्यावरती सदर कायद्याच्या कलम ३ मधील व्याख्येप्रमाणे केवळ गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदारावरती कौटुंबिक हिंसाचार केल्याचे सिध्द होत आहे.

**११**. अर्जदाराने गैरअर्जदारांकडून संरक्षण आदेश, लग्नातील स्त्रीधन परत मिळण्यासह घरभाडे मिळण्याची मागणी केलेली आहे. परंतू अर्जदाराने ती माहेरी राहत असल्यापासून तिच्यावरती गैरअर्जदरांनी केलेल्या हिंसाचाराचा, लग्नात दिलेल्या स्त्रीधनाचा आणि सध्या राहत असलेले ठिकाण राहण्यास अपायकारक असल्यामुळे इतर ठिकाणी भाडयाने राहत असल्याचा कोणताही पुरावा दिलेला नाही. सबब, अर्जदाराच्या सदर मागण्या पुरेशा पुराव्या अभावी जरी विनाआव्हानित राहिलेलया असल्या तरी मान्य करता येऊ शकत नाही.

**१२**. अर्जदाराने तिला दरमहा १५,०००/- आर्थिक मदतीसह ५,००,०००/- नुकसान भरपाईची मागणी केली आहे. तिच्या कथना व पुराव्याप्रमाणे, गैरअर्जदार क्र.१ ला हॉटेलमध्ये नोकरी पासून दरमहा १५,०००/- आणि त्याच्या वडीलांना कसण्यासाठी घेतलेल्या ४५ एकर शेतीतून प्रतिवर्ष ३,५०,०००/- उत्पन्न मिळत आहे. परंतु तीने गैरअर्जदार क्र. १ कोणत्या प्रकारचे व कोणत्या ठिकाणी काम करतो याबाबतचा पुरावा दिलेला नाही.

**१३.** जरी अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ चे उत्पन्न सिध्द करु शकली नसली तरी गैरअर्जदार क्र.१ ने देखील त्याचे उत्पन्न पटलावरती आणण्याचा कोणताही प्रयत्न केलेला नाही. तसेच अर्जदाराला उत्पन्नाचे साधन असल्याचे देखील दर्शवलेले नाही. गैरअर्जदार क्र.१ ने तो हॉटेल मध्ये नोकरी करत असल्याची बाब विवादित केलेली नसल्यामुळे जरी त्याचे निश्चित उत्पन्न पटलावरती आले नसले तरी अर्जदाराच्या कथनाप्रमाणे साहजिकच त्याला नोकरी पासून कमीत कमी ८ ते १०,०००/– रुपये मिळू शकतात. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे गैरअर्जदार क्र. ३ ने कसण्यासाठी ४५ एकर शेती घेतलेली आहे ही बाब विचारात घेता गैरअर्जदार क्र. १ वरती अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणाचीही जबाबदारी नसल्याचे दिसून येते. सबब, अर्जदाराचे वय आणि गैरअर्जदार क्र.१ चे उत्पन्न विचारात घेता, तो निश्चितपणे निर्वाहभत्यासाठी अर्जदाराला दरमहा ४,०००/– रुपये देऊ शकतो.

**१४.** अर्जदाराने तिच्यावरती झालेल्या कौटुंबिक हिंसाचाराबाबत ५,००,०००/– रुपयांची नुकसान भरपाई मिळण्याची मागणी केली आहे. निश्चितच अर्जदार तिचा झालेला शारिरीक व मानसिक हानीबाबतचे कोणतेही मूल्य प्रमाणित करु शकत नाही. परंतु, अर्जदार ही विवाहित असून गैरअर्जदार क्र.१ च्या कृतीमुळे तिच्यावरती शारिरीक व मानसिक आघात झालेला आहे. तसेच गैरअर्जदार क्र. १ च्या आजाराची तिला लागण झालेली आहे. त्यामुळे तिला सदर कायद्याच्या कलम २२ प्रमाणे ५०,०००/– रुपये नुकसान भरपाई देणे न्यायोचित ठरते. सबब, मी वरील विवेचनावरुन मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होय, मुद्दा क्र.२ व ३ चा निष्कर्ष नाही आणि मुद्दा क्र.४ व ५ चा निष्कर्ष अंशतः होय असा नोंदवत आहे.

**मुद्दा क्र.६ करीता –**

**१५.** सदर प्रकरणात अंतरीम पोटगीचा कोणताही आदेश झालेला नसल्यामुळे प्रस्तूतचा अर्ज हा अर्ज दाखल तारखेपासून मंजूर करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर जरी महिलांना न्यायालयीन शुल्क माफ असले तरी अर्जदारास प्रस्तूत प्रकरणासाठी हजर राहण्यासह विधिज्ञांना द्याव्या लागलेल्या शुल्काचा विचार करता, खर्चाकरीता १०,०००/– देणे न्यायोचित ठरते. त्यामुळे मी मुद्दा क्र.६ साठी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे,

## – आदेश –

१. अर्ज खालील प्रमाणे अंशत: मंजुर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदारास अर्ज दाखल तारखे पासुन कौटुंबिक हिसांचारा पासुन महिलांचे संरक्षण अधिनियम कायदा कलम २० अन्वये दरमहा आर्थिक मदत/पोटगी म्हणुन रक्कम रुपये ४,०००/– (चार हजार मात्र) रोखीने अथवा इतर प्रचलित माध्यमाने दर महिन्याच्या १० तारखेपूर्वी दयावी असे आदेशीत करण्यात येते.

३. गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदाराला घरगुती हिंसाचारामुळे झालेल्या त्रासा बद्दल कौटुंबिक हिसांचारा पासुन महिलांचे संरक्षण अधिनियम कायदा कलम २२ अन्वये नुकसान भरपाई म्हणुन रुपये ५०,०००/– (पन्नास हजार मात्र) द्यावे असे आदेशीत करण्यात येते.

४. गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदारास अर्जाचा किरकोळ खर्च म्हणुन रुपये १०,०००/– ( दहा हजार मात्र) द्यावे असे आदेशीत करण्यात येते.

५. अर्जदाराच्या इतर मागण्या फेटाळण्यात आलेल्या आहेत.

६. सदर न्यायनिर्णयाची प्रत उभयपक्षकारांना कौटुंबिक हिसांचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम कायदा कलम २४ अन्वये मागणी वरुन विनाशुल्क देण्यात यावी.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

**(आर. पी. थोरे)**

दिनांक – १६.०५.२०२६.
न्या.अ.सां. क्र.०२८९७

ठिकाण – आजरा .
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.

फौजदारी नियमावलीच्या परिच्छेद ४४ (३) परिशिष्ट ६ प्रमाणे भाग – क.

## साक्षीदारांचा तपशील

**१. अर्जदारातर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी.**

| अनु.क्र. | साक्षीदाराचे नाव | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | क्रांती सुरेश राणे | १० | स्वतः |

**२. अर्जदारातर्फे निशाणीकृत झालेल्या कागदपत्रांची यादी.**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **कागदपत्राचे स्वरुप** |
|---|---|---|
| **१.** | नि.क्र.३/१ | विवाह नोंदणी पत्र |
| **२.** | नि.क्र.३/२ | अर्जदाराचे आधार ओळखपत्र |

**३. गैरअर्जदारातर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी.**

| **अनु.क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **निशाणी क्रमांक** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|---|

निरंक

**४. गैरअर्जदारातर्फे निशाणीकृत झालेल्या कागदपत्रांची यादी.**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **कागदपत्राचे स्वरुप** |
|---|---|---|

निरंक

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

**(आर. पी. थोरे)**

दिनांक – १६.०५.२०२६.
न्या.अ.सां. क्र.०२८९७

ठिकाण – आजरा .
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.